# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११

## नियामक मंडळाची ३१ वी बैठक दिनांक १९ डिसेंबर २००२

मा. ना. अजित पवार, मंत्री, पाटबंधारे (कृष्णा खोरे व कोकण महामंडळे) व फलोत्पादन आणि अध्यक्ष (मकृखोविम) यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ३१ वी बैठक दि.१९.१२.२००२ रोजी सिंचन भवन, नागपूर येथे संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये खालील ठराव पारित करण्यात आले.

ठराव क्र.३१/१

''ठराव करण्यात येतो की, ३० व्या बैठकीमध्ये पारित केलेले ठराव क्र. ३०/२ वगळता इतर सर्व ठराव कायम करण्यात येत आहेत. ठराव क्र. ३०/२ खालीलप्रमाणे सुधारित करण्यात येत आहे.

सुधारित ठराव क्र. ३०/२

ठराव करण्यात येतो की, महामंडळ स्थापनेचा अध्यादेश क्र. ३/१९९६ च्या अनुषंगाने राज्य शासनाने आदेश क्र. मकृखोविम/११९५/२१२/९५/जसंनि दि.१६.०२.९६ नुसार व त्यानंतरही वेळोवेळी शासनाने महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाकडे वर्ग केलेली पाटबंधारे विभागाची सर्व आस्थापना (सर्व संवर्गासह) अधिनियम क्र. १५/४.४.९६ च्या कलम १७(२) मधील तरतूद विचारात घेता, राज्य शासनाकडे दि.१.१२.२००२ पासून प्रत्यावर्तित करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र. ३१/२

''ठराव करण्यात येतो की; २०००-२००१ या वर्षाचा महामंडळाचा वार्षिक अहवाल शासनास सादर करण्याच्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र. ३१/३

''ठराव करण्यात येतो की, महामंडळाच्या कार्यक्षेत्रात औद्योगिक पाणी वापरासाठी पाणीपट्टीचे दर (पेयजल इ. उद्योग वगळून) शासन निर्णय क्र. संकीर्ण२००२/(१४८/२००२)/सिंव्य (धो) दि.२८.११.०२ प्रमाणे दि.१.९.२००१ पासून लागू करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र. ३१/४

''ठराव करण्यात येतो की,

१. कृष्णा पाणी तंटा लवादाच्या मे १९७६ च्या अंतिम निर्णयाचे पुनर्विलोकन करण्यासाठी कर्नाटक व महाराष्ट्र राज्याने केंद्र सरकारकडे केलेली विनंती लक्षात घेऊन, नवीन

मा. मंत्री, पा (कृखो व कोपाविमं) व अध्यक्ष,
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म., पुणे

लवादासमोर राज्याची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी व राज्याच्या वाट्यास जास्त पाणी मिळावे यादृष्टीने माहितीचे संकलन व विश्लेषण, प्रकल्पांचे अभ्यास, इतर राज्यांनी मांडलेल्या मुद्यांना प्रभावी उत्तरे देणे इ. कामे करण्यासाठी शासनाने सूचित केल्याप्रमाणे व परिशिष्ट क्र.४ मधील नमूद केलेल्या संरचनेनुसार राज्य शासनाच्या अधिपत्याखाली कृष्णा पाणी तंटा लवाद पुनर्विलोकन कक्ष निर्माण करण्यासाठी व त्या कक्षासाठी आवश्यक आस्थापनेस मान्यता देण्यासाठीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर कक्षामधील मुख्य अभियंता (कृष्णा पाणी तंटा लवाद) व सहसचिव यांच्या अधिपत्याखालील कृष्णा पाणी वाटप तंटा लवाद पुनर्विलोकन कक्षाच्या सर्व आस्थापनेचा (पगार व भत्ते) खर्च राज्य शासनामार्फत करण्यात यावा.

३. कृष्णा पाणी वाटप तंटा लवाद पुनर्विलोकन कक्षाचा कार्यालयीन खर्च, वाहन व्यवस्था, प्रवास व दैनिक भत्ते, वकीलांची फी, सल्लागारांचा सेवा खर्च व अनुषंगिक बाबी इ. साठी होणारा आवश्यक तो खर्च करण्याचे अधिकार कार्यकारी संचालक यांना देण्यात येत आहेत."

ठराव क्र. ३१/५

"ठराव करण्यात येतो की, श्री. श्री. त्रिं. देवकुळे, निवृत्त प्रधान सचिव व श्री. के. एस. शंकरराव, निवृत्त अधीक्षक अभियंता यांची महामंडळाचे तांत्रिक सल्लागार म्हणून १.१.२००३ ते ३१.१२.२००३ या एक वर्षाच्या कालावधीसाठी नियामक मंडळाचा मंजूर ठराव क्र. २७/५(अ) मधील अटी व शर्तीच्या अधीन राहून, पुनर्नियुक्ती करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ३१/६

"ठराव करण्यात येतो की,

१. तासगांव तालुक्यातील तीव्र दुष्काळी परिस्थिती विचारात घेऊन त्या परिसरातील द्राक्षबागा जिवंत ठेवण्यासाठी "तासगांव तालुका फळे-फुले उत्पादक संस्था, तासगांव" यांनी मागणी केल्यानुसार या परिसरातील सिद्धराज पाणीपुरवठा संस्थेने उपलब्ध करुन दिलेले पाणी पाईप लाईनद्वारे उपसा पद्धतीने मणेराजुरी गावापर्यंत नेण्याची योजना महामंडळाने ठेव काम धर्तीवर (Deposit Contribution Work) हाती घेण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर योजना कार्यान्वित करण्याची तातडी विचारात घेता सदर योजनेचा अंदाजे रु. २०० लक्ष खर्च सुरुवातीस करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

मा. मंत्री, पा (कृखो व कोपाविमं) व अध्यक्ष,
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म., पुणे

३. सदर योजनेसाठी झालेली महामंडळाची गुंतवणूक व्याजासह वसुलीसाठी तासगांव तालुका फळे-फुले उत्पादक संस्था, तासगांव यांच्याशी योग्य तो करारनामा करण्यासाठी नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

४. योजना कार्यान्वित करण्याची तातडी विचारात घेता सदर योजनेसाठी प्रचलित कार्यपद्धतीनुसार निविदा प्रक्रिया शक्य नसल्याने सदर योजनेचे काम जैन इरिगेशन सिस्टीम प्रा. लि. या मान्यताप्राप्त उत्पादक कंपनीकडून टर्न की धर्तीवर करुन घेण्याच्या प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र. ३१/७

"ठराव करण्यात येतो की, महामंडळातील प्रकल्पांना पर्यावरण व वनविभागाची मान्यता घेण्याची कार्यवाही महामंडळाने प्राधान्याने करावी व याबाबतचा आढावा राज्यमंत्री व उपाध्यक्ष आणि सचिव (लाक्षेवि) व सदस्य यांनी वेळोवेळी घ्यावा व त्याबाबत नियामक मंडळास अवगत करावे."

ठराव क्र. ३१/८

"ठराव करण्यात येतो की, शासनाने दि.३०.५.२००२ च्या पत्राने प्रकल्पांची कोणतीही नवीन कामे हाती घेऊ नयेत व नव्याने दायित्व निर्माण करु नये असे निर्देश दिले आहेत.

(१) तथापि विशेष बाब म्हणून, उस्मानाबाद व बीड जिल्ह्यातील लघु पाटबंधारे प्रकल्पांच्या अंदाजपत्रकीय अथवा कमी दराने प्राप्त झालेल्या व स्विकृत केलेल्या निविदांचे कार्यारंभ आदेश देण्यास व त्या अनुषंगाने त्या निविदांवरील निर्माण होणा-या एकूण दायित्वासही नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

(२) आर्थिक वर्ष २००२-०३ साठी शासनाने मंजूर केलेल्या रु.४४३.४६ कोटींच्या जिल्हानिहाय कार्यक्रमात महामंडळाने प्रस्तावित केलेल्या उस्मानाबाद व बीड जिल्ह्यातील लघु पाटबंधारे प्रकल्पांसाठी तरतुदींच्या मर्यादेत २००२-०३ मध्ये वरील (१) मध्ये नमूद केलेल्या कामांचे दायित्व सिमित करण्यात यावे."

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म., पुणे

मा. मंत्री, पा (कृखो व कोपाविमं) व अध्यक्ष,
म.कृ.खो.वि.म., पुणे